**<u>आदेश मोटार अपघात दावा अर्ज क्र.०३/२०२३ मधील निशाणी क्र.२२</u>**

०१. प्रस्तुत अर्ज मुळ अर्जामध्ये दुरुस्ती करण्यास परवानगी मिळावी म्हणुन दाखल केलेला आहे.

०२. अर्जदारांचे असे म्हणणे आहे कि, दिनांक ०४/०९/२०२३ रोजी मुळ अर्जदार मयत झालेनंतर त्यांचे वारस अभिलेखावर घेण्यात आलेले आहेत. त्या अनुषंगाने मुळ अर्जामध्ये नवीन परिच्छेद १३अ दाखल करणे आवश्यक असुन मुळ अर्जदाराच्या मृत्युमुळे प्रस्तुत अर्ज दाखल करण्यास कारण घडले आहे. अर्जदार हे दुरुस्तीने असे नमुद करु इच्छीतात कि, अपघातात गंभिर जखमी झाल्यामुळे मुळ अर्जदार नामदेव यांचा मृत्यु झाला आहे. त्यापुर्वी त्यांना झालेल्या जखमांबाबत सामान्य रुग्णालय, अहमदनगर यांनी प्रमाणपत्र देखील दिलेले आहे. गैरअर्जदार १ यांचेतर्फे सदर अर्जाचा प्रखर विरोध करण्यात आला. नियोजित दुरुस्तीस पुष्ठी देणारा कोणताही कागदोपत्री पुरावा दाखल केलेला नाही. त्यामुळे नियोजित दुरुस्ती मंजुर करता येणार नाही असे त्यांनी नमुद केलेले आहे.

०३. पक्षकारांतर्फे हजर विद्वान वकिलांचा युक्तीवाद ऐकण्यात आला. मुळ अर्ज मयत नामदेव यांनी त्यांना झालेल्या अपंगत्वाबाबत, जखमांबाबत नुकसानभरपाई मिळावी म्हणुन दाखल केलेला आहे. अर्ज प्रलंबित असताना ते मयत झाले आहे. त्यांचा मृत्यु अपघातातील जखमांमुळे झाल्याचे अर्जदारांचे म्हणणे आहे. गैरअर्जदारांनी ती बाब नाकारली आहे. मात्र या घडीस त्याबाबत कोणताही निष्कर्ष काढता येणार नाही. दुरुस्ती मंजुर केल्याशिवाय अर्जदारांना तशी बाब सिध्द करता येणार नाही. याउलट गैरअर्जदारांना त्याचा विरोध करण्याची संधी अर्जामध्ये ती बाब नमुद केल्यानंतरच मिळेल. नियोजित दुरुस्तीमुळे गैरअर्जदारांचे नुकसान होण्याची शक्यता नाही. अदयाप प्रकरण पुराव्याकरीता नेमण्यात आलेले नाही.

त्यामुळे अर्ज मंजुर होण्यास पात्र आहे. सबब खालील आदेश पारित करण्यात येत आहे.

**आदेश**

१. अर्ज निशाणी २२ मंजुर करण्यात येत आहे.

२. अर्जदारांनी नियोजीत दुरुस्ती पुढील तारखेपर्यंत करावी व दुरुस्त मुळ अर्जाची प्रत दाखल करावी.

MANSOOR MAHAMOOD SHAIKH

Digitally signed by MANSOOR MAHAMOOD SHAIKH
Date: 2024.09.26 17:15:18 +0530

(एम.एम.शेख)

दिनांक :२५/०९/२०२४. सदस्य मोटार अपघात न्यायाधिकरण, संगमनेर